# पेप्सीची 'व्हॉट्स युअर वे' कॅम्पेन 'यंगिस्तान' साठी

पुणे : तरुणाईला एकत्र आणणारी ही कॅम्पेन वेगळी कशी? व्हॉट्स युअर वे ही पेप्सी आणि तरुण मंडळी यांच्यातला संवाद आहे. यात प्रत्येकाला स्वत:ची स्पेस टिकवत जगाशी संपर्क करायचा आहे. हे जग इंटरनेट वापरणाऱ्या ३ कोटी तरुणांचं नेटवर्किंग साइट्सवर संपर्कात असलेल्या ६० लाख युवकांचं किंवा मोबाईल फोनला भिडलेल्या २५ कोटी युवा पिढीचं आहे.




यंगिस्तानी (यंग हिंदुस्थानी) आपण किती 'कूल' राहून समस्यांना सामोरे जातो हे सिद्ध करण्यासाठी कॅम्पेनमध्ये सामील होतील आणि त्यातल्या चार कूलेस्ट यंगिस्तानींची छबी पेप्सीच्या माय कॅनवर झळकेल. याशिवाय रोज एक यंगिस्तानी ऑफ द डे निवडला जाईल आणि त्याला एक महिना पुरेल एवढा पेप्सीचा साठा आणि ५००० रुपयांचा एसएमएस आणि टॉक टाइम मिळेल. सर्व विजेत्यांना मिळून पेप्सीतर्फे २० लाख रुपये मूल्याचा टॉक टाइम देण्यात येणार आहे.

या कॅम्पेनविषयी बोलताना पेप्सिको इंडियाच्या कोला व्यवसायाचे मार्केटिंग विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष संदीपसिंग अरोरा म्हणाले, की तरुणाईचा एकमेकांशी असलेला संवाद वाढवून पेप्सी त्यांच्यातील गप्पांचा अविभाज्य भाग होऊ इच्छित आहे आणि या नव्या कॅम्पेनमुळे पेप्सीची तरुण पिढीशी असलेली जवळीक आणखी दृढ होईल.